N.A. ORDER

श्री. आशिष वानखेडे, तहसिलदार, नागपूर (ग्रामीण) यांचे कार्यालय, नागपूर

रा.मा.क्र. ६९/एन.ए.पी.-३४/२०२२-२०२३
मौजा – **आष्टी व येरला**, प. ह. नं.- **०३**
दिनांक- **०१ डिसेंबर, २०२२**

वाचा : मा.जिल्हाधिकारी,नागपूर यांचे अधिकार प्रदान आदेश क्रं.प्रस्तुत/कावि-१४६९/२२, दि.१९/०९/२०२२.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६, च्या कलम -४२-अ मधील तरतुदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाचा सनदेचा नमुना.

ज्याअर्थी, जिल्हा- नागपूर, तालुका-नागपूर (ग्रामीण), मौजा-**आष्टी**, प. ह. नं.- **०३ येथील सर्व्हे क्र. ५१, आराजी ०.५७ हे. आर. (५७००.०० चौ. मी.) व मौजा-येरला**, प. ह. नं.- **०३** येथील सर्व्हे क्रमांक **१४ (पार्ट), २२अ, २२ब, २३, २४/१, २४/२, २५/१, २५/२, २८,** आराजी १२.०८ हे. आर. (**१२०८००.०० चौ. मी.**) या जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ च्या तरतुदीन्वये, **"निवासी"** अकृषक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास कार्यकारी अभियंता-२, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे अंतिम मंजूरी अहवाल क्र.का.अभि./नामप्रविप्रा/**७८०२**, दिनांक-**१४/११/२०२२**, अन्वये विकास/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे. ज्यासंबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालील प्रमाणे आहे.

	AREA STATEMENT MOUZA YERLA & ASKTI		
A	**TOTAL LAND AREA MINIMUM AS PER "K" PRAT**		
	MOUZA - YERLA	120762.122	SQ.M.
	MOUZA - AASHTI	5652.801	SQ.M.
B	**TOTAL PLOTTABLE AREA**		
	MOUZA - YERLA	74690.384	SQ.M.
	MOUZA - AASHTI	4249.547	SQ.M.
C	**TOTAL OPEN SPACE AREA**		
	MOUZA - YERLA	16544.791	SQ.M.
	MOUZA - AASHTI	0.000	SQ.M.
D	**TOTAL AREA UNDER HIGH TENSION LINE CORRIDOR**		
	MOUZA - YERLA	0.000	SQ.M.
	MOUZA - AASHTI	0.000	SQ.M.
E	**TOTAL AREA UNDER ROAD WIDENING**		
	MOUZA - YERLA	3394.773	SQ.M.
	MOUZA - AASHTI	446.663	SQ.M.
F	**TOTAL AREA UNDER HANDED OVER TO N.M.R.D.A. SHARE**		
	MOUZA - YERLA	0.000	SQ.M.
	MOUZA - AASHTI	0.000	SQ.M.

ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमुद **"निवासी"** अकृषक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढील प्रमाणे निर्धारित करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे मौजा-**आष्टी**, प. ह. नं.- **०३ येथील सर्व्हे क्र. ५१, आराजी ०.५७ हे. आर. (५७००.०० चौ. मी.) "निवासी"** प्रयोजनार्थ अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र म्हणजेच **४२४९.५४७ चौ. मी.** (AREA UNDER PLOT ४२४९.५४७ + AMENITY SPACE PROPOSED ०.०० = ४२४९.५४७) चौ. मीटरला **१०** पैसे प्रति चौ. मीटर याप्रमाणे अकृषक महसूल कर रुपये **४२५/-**, ग्रामपंचायत कर अकृषक करा एवढा रुपये **४२५/-**, जिल्हा परिषद सेस सारा **७** पट अकृषक कराच्या रुपये **२,९७५/-** परावर्तीत कर अकृषक साऱ्याचे **५** पट म्हणजेच रुपये **२,१२५/-** असे एकूण रुपये **५,९५०/-** आकारणी निर्धारित होते. तसेच **मौजा-येरला**, प. ह. नं.- **०३** येथील सर्व्हे क्रमांक **१४ (पार्ट), २२अ, २२ब, २३, २४/१, २४/२, २५/१, २५/२, २८,** आराजी १२.०८ हे. आर. (**१२०८००.०० चौ. मी.**) **"निवासी"** प्रयोजनार्थ अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र म्हणजेच **७४६९०.३८४ चौ. मी.** (AREA UNDER PLOT **७४६९०.३८४** + AMENITY SPACE PROPOSED **०.०० = ७४६९०.३८४**) चौ. मीटरला **१०** पैसे प्रति चौ. मीटर याप्रमाणे अकृषक महसूल कर रुपये **७,४७०/-**, ग्रामपंचायत कर अकृषक करा एवढा रुपये **७,४७०/-**, जिल्हा परिषद सेस सारा **७** पट अकृषक कराच्या रुपये **५२,२९०/-** परावर्तीत कर अकृषक साऱ्याचे **५** पट म्हणजेच रुपये **३७,३५०/-** असे एकूण रुपये **१,०४,५८०/-** आकारणी निर्धारित होते.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार आणि खालील शर्तीना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्यावर वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यांत आलेल्या **"निवासी"** अकृषक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम **४२-अ** अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, यांनी दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ही सनद देण्यात येत आहे.

१. आकारणी उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसूली योग्य असलेल्या आकराणी ऐवजी वर उल्लेखीत विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक **३१ जूलै २०२३** (वर्ष) रोजी संपणाऱ्या तारीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी **मौजा-आष्टी रुपये ४२५/- (रुपये चारशे पंचविस फक्त) व मौजा-येरला रुपये ७,४७०/-, (रुपये सात हजार चारशे सत्तर फक्त)** या दराने परिगणीत होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडून, वेळोवेळी निश्चित करण्यांत येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२. उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसूली योग्य असलेली सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३. वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४. सदर जमिनी या नागरी जमीन कमाल धारणा व कोर्ट ऑफ वार्डस मध्ये बाधित होत असल्यास सदर अकृषक आकारणी रद्द करण्यात येईल.

५. उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तदन्वये, करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोटकलम (२) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यानंतर उक्त जमीन भोगवटदार यांच्या वहीवाटीत असल्याचे चालू ठेवता येईल.

त्याची साक्ष म्हणून **नागपूर** जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी/जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे वतीने स्वाक्षरी केली आहे, आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुद्धा दिनांक- **०१ डिसेंबर, २०२२** रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

(भोगवटादाराची स्वाक्षरी)

श्री. नारायण चदिराम डेंबले

श्री. विजय किंमतराय रामानी

श्रीमती प्रिया विजय रामानी

श्री. यशवंत विनायकराव काथोटे

श्री. हेमंत वामनराव रंभाड H.W. Rombhad

(साक्षीदारांची स्वाक्षरी व नांव)

अ) Ramani

श्री./श्रीमती FALGUNI RAMANI

ब) P.S. Saonikar

श्री./श्रीमती Pankaj Saonikar

(साक्षीदारांची स्वाक्षरी व नांव)

अ) Ramani

श्री./श्रीमती FALGUNI RAMANI

ब) P.S. Saonikar

श्री./श्रीमती Pankaj Saonikar

आम्ही जाहीर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: अर्जदार **श्री. नारायण चदिराम डेंबले, श्री. विजय किंमतराय रामानी, श्रीमती प्रिया विजय रामानी, श्री. यशवंत विनायकराव काथोटे, श्री. हेमंत वामनराव रंभाड, रा. एम. जी. हाऊस, दुसरा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१** यांनी स्वाक्षरी केलेली आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

ASHISH SUKHDEORAO WANKHEDE Digitally signed by ASHISH SUKHDEORAO WANKHEDE Date: 2022.12.01 16:35:28 +05'30'

तहसिलदार,
नागपूर (ग्रामीण)

प्रतिलीपी :

१. मा. जिल्हाधिकारी, नागपूर (अकृषक शाखा) यांना माहितीस सविनय सादर.
२. मा. कार्यकारी अभियंता -१, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
३. ग्राम अधिकारी सा. क्रं. **०३**, मौजा-**आष्टी/येरला** यांना सदर आदेशाची नोंद गाव नमुना२ मध्ये नोंद घेण्यास व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
४. सह. जिल्हा निबंधक श्रेणी — २, क्रं. ७ व १० नागपूर (ग्रामीण) यांना माहितीकरीता अग्रेषित.
५. उप अधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर (ग्रा.) यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
६. अर्जदार **श्री. नारायण चदिराम डेंबले, श्री. विजय किंमतराय रामानी, श्रीमती प्रिया विजय रामानी, श्री. यशवंत विनायकराव काथोटे, श्री. हेमंत वामनराव रंभाड, रा. एम. जी. हाऊस, दुसरा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१** यांना माहिती तथा उपरोक्त अटी व शर्तीच्या पुर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी तसेच अकृषक कराची रक्कम **१,१०,५३०/-** चलानचे स्वरुपात शासन जमा करण्याकरीता रवाना.

ASHISH SUKHDEORAO WANKHEDE Digitally signed by ASHISH SUKHDEORAO WANKHEDE Date: 2022.12.01 16:36:10 +05'30'

तहसिलदार,
नागपूर (ग्रामीण)